ePaper
पवार बाबा की जय! चिमुकल्याची घोषणा, शरद पवार भारावले



| वर्ष - 7 | अंक -69 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**
- जातीयवादी नीलमताई..!
- पुण्यात पोलिसांचा वचक बसण्यासाठी काढली गुंडांची धिंड!
- ‘सीएमई’ हद्दीतील सांडपाणी प्रकल्पाला

www.mahaenews.com | रविवार, दिनांक 9 जुलै 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# 14 लाख 37 हजार 383 मतदार ठरवणार
# पिंपरी-चिंचवडचे ‘कारभारी’!

## » अंतिम मतदार याद्या प्रसिद्ध : स्थानिक नेत्यांची जुळवाजुळव सुरू

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यातील राजकीय सत्तानाट्यानंतर आता आगामी महापालिका निवडणुकीचे वेध लागले आहेत. राज्य निवडणूक आयोगाने मतदार याद्या अंतिम करण्याची परिपत्रक काढल्यानंतर आता स्थानिक नेत्यांची जुळवाजुळव सुरू झाली आहे.**




स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चालू वर्षी झाल्यास १४ लाख ३७ हजार ३८३ मतदार पिंपरी-चिंचवडचे कारभारी ठरविणार आहेत. जिल्हा निवडणूक शाखेकडून चालू वर्षी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

पिंपरी-चिंचवड शहर आणि उर्वरित ग्रामीण भागातील जिल्ह्यातील २१ विधानसभा मतदारसंघांत एकूण ७९ लाख ५१ हजार ४२० मतदार झाले आहेत. पुण्यात विधानसभेचे आठ, पिंपरी-चिंचवडमध्ये तीन, तर उर्वरित ग्रामीण भागात दहा विधानसभा मतदारसंघ आहेत. चालू वर्षी महापालिकांच्या निवडणुका जाहीर झाल्यास ही मतदारयादी वापरली जाणार आहे. त्यामुळे या यादीला महत्त्व प्राप्त झाले आहे.

प्रारूप मतदार यादी गेल्या वर्षी ९ नोव्हेंबरला जाहीर करण्यात आली होती. त्यामध्ये जिल्ह्यात ७८ लाख ७६ हजार ९५० मतदार होते. त्यानंतर नवमतदार, समाजातील वंचित घटकांसाठी मतदार नोंदणीच्या खास मोहिमांचे आयोजन केले होते. त्यामुळे प्रारूप मतदार यादीनंतर अंतिम यादीत ७४ हजार ४७० मतदार वाढले आहेत.

### शहरातील मतदारसंख्या

| मतदारसंघ | मतदार |
|---|---|
| पिंपरी | - ३ लाख ५७ हजार २०७ |
| चिंचवड | - ५ लाख ६६ हजार ४१५ |
| भोसरी | - ५ लाख १३ हजार ७६१ |
| एकूण | - १४ लाख ३७ हजार ३८३ |

### आपले नाव कसे शोधाल?

»मतदार यादीत नाव आहे किंवा कसे, हे HTTP://WWW.NVSP.IN या संकेतस्थळावर किंवा VOTERS HELPLINE या मोबाइल उपयोजनवर (ॲप) संपूर्ण नाव, वय, लिंग, राज्य, जिल्हा आणि विधानसभा मतदारसंघ ही माहिती भरल्यानंतर समजेल.

---

# पिंपरी-चिंचवड ‘दामिनी पथक’चे सक्षमीकरण!

## »पालकमंत्री चंद्रकांत पाटील : पोलीस आयुक्तालयाच्या वाहनांचे लोकार्पण

। पिंपरी । महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयात कार्यरत असलेले दामिनी पथक सक्षम करण्यासाठी आवश्यक सहकार्य करण्यात येईल, असे प्रतिपादन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.**



चिंचवड पोलिस आयुक्तालयात आयोजित जिल्हा नियोजन निधीतून पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयासाठी खरेदी करण्यात आलेल्या 5 स्कॉर्पिओ आणि 12 बोलेरो वाहनांच्या लोकार्पण कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी खासदार श्रीरंग बारणे, माजी खासदार अमर साबळे, आमदार महेश लांडगे, दिलीप मोहिते, उमा खापरे, पोलिस आयुक्त विनय कुमार चोबे, सह पोलिस आयुक्त डॉ. संजय शिंदे, अतिरिक्त पोलीस आयुक्त वसंत परदेशी, पोलीस उपआयुक्त स्वप्ना गोरे मॅडम, पोलीस उपआयुक्त परिमंडळ दोन काकासाहेब डोळे आदी उपस्थित होते.

पालकमंत्री पाटील म्हणाले, महिलांच्या सुरक्षेसाठी पिंपरी चिंचवड आयुक्तालयाच्या हद्दीत दामिनी पथकांची संख्या वाढवावी. त्यासाठी वाहने कमी पडू देणार नाही. सायबर क्राईम लॅबची संख्या वाढवण्यासाठी प्रयत्न करावेत. पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तालयातील दिशा उपक्रमात सहभागी ७ अशासकीय संस्थांच्या प्रतिनिधींसोबत बैठक घेऊन त्यांच्या सहभाग वाढवावा. ज्येष्ठ नागरिक कक्षाद्वारे ज्येष्ठांच्या समस्या वेळेत सोडवण्यासाठी प्रयत्न करावेत. यावेळी पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तालयातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

### आयुक्तालयाच्या समस्या सोडवणार

»: पालकमंत्रीनवीन वाहनांच्या समायोजनामुळे पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तलयातील बरासचा वाहतुकीचा प्रश्न मिटण्यास मदत होणार असून गस्त घालण्यासाठी वाहनांची मदत होईल. पोलिसांच्या वसाहती, रिक्त पदे, जलद प्रतिसाद पथक, प्रलंबित प्रस्ताव व इतर मागण्या आणि समस्या याविषयी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्यासोबत बैठक घेऊन प्रश्न निकाली काढले जातील, असे आश्वासनही पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी यावेळी दिले.

# जातीयवादी नीलमताई..!

## » सुषमा अंधारे यांची घणाघाती पोस्ट, टीकेची सव्याज परतफेड

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी उद्धव ठाकरे यांची साथ सोडत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची साथ देत शिवसेनेत प्रवेश केला आहे. हा उद्धव ठाकरे यांना मोठा धक्का आहे. नीलम गोऱ्हे यांनी शिवसेनेत प्रवेश करताना शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे ) पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांच्यावर सडकून टीका केली आहे. पक्षात सटरफटर लोक आल्यानं आम्ही नाराज नाही, असं म्हणत नीलम गोऱ्हे यांनी अंधारे यांच्यावर निशाणा साधला आहे.**



**मॅडम म्हणूनच तुमच्या पक्षप्रवेशाच्या वेळी एकही सटरफटर काय तुमच्यासारखा सोकॉल्ड सुद्धा एकही माणूस तुमच्या सोबत दिसला नाही. यावरूनच आयुष्यात तुम्ही पैसा आणि पद खूप कमावली पण माणुसकी नाही हे स्पष्ट होते. ठाकरेंचा एक माणूस आपल्याकडे घेतला याचा शिंदेंना कदाचित आसुरी आनंद होईल पण तुम्हाला घेण्याने त्यांना एका मताचाही फायदा होणार नाही. तुम्ही धोरणी राजकारणी असू शकाल पण माणूस म्हणून भणंग आणि कफल्लक आहात.**

नीलम गोऱ्हे यांच्या या टीकेनंतर सुषमा अंधारे यांनी आता नीलम गोऱ्हे यांच्यावर गंभीर आरोप करत अनेक धक्कादायक गौप्यस्फोट केले आहेत. नीलम गोऱ्हे यांनी कार्यकर्त्यांना दिलेली वागणूक, जातीचा असलेला अहंकार यांचा पाढाच अंधारे यांनी वाचला आहे. इतकंच काय तर २०१८ साली आपला शिवसेना प्रवेश देखील नीलम गोऱ्हे यांनीच रोखल्याचं अंधारे म्हणाल्या. तर, आपला ठाकरे गटात झालेला प्रवेशही नीलमताईंना खटकला असल्याचं अंधारे यांनी म्हणाल्या.

### सुषमा अंधारे यांची फेसबुक पोस्ट

*(अ) प्रिय ताई, काही माणसं पदामुळे मोठी होतात. काही पदं माणसांमुळे मोठी होतात पण काही माणसं निव्वळ माणसांमुळे मोठे होतात. तुम्ही यातल्या पहिल्या प्रकारातल्या. तुमचे अनेक किस्से महिला पदाधिकारी सांगायचे तेव्हा मला त्यांचा राग यायचा. वाटायचं, एका विद्वान बाईला निष्कारण बदनाम केलं जातंय. लातुरच्या संघटिका चालक मामी दोन महिन्यांपूर्वी डोळ्यात पाणी आणून म्हणाल्या, नीलम ताईने मला प्रेसमध्ये बसू दिलं नाही. अपमानित केलं. तर पुण्याच्या स्वाती ढमाले यांना तुम्ही गाडीत बसू दिलं नाही. तर सोलापूरच्या संघटिकेला मुंबई बंगल्यावर वॉशरूम वापरण्यास मज्जाव केला. असे गंभीर आरोप अंधारे यांनी नीलम गोऱ्हे यांच्यावर केले आहेत. शिल्पकार राजेंद्र आल्हाट यांच्या एका प्रदर्शनात उद्घाटनाला गेल्यावर हातात कात्री देतो का म्हणून त्याला डाफरून डाफरून बोललात. अमरावतीची पोलिस पत्नी वर्षा भोयरने तुम्हाला मदत मागितली पण जात बघून इग्नोर केले. तुमच्या स्वश्रेष्ठत्व अन् अहंकाराचे अनेक किस्से म्हटलं तर वरवर खूप साधारण वाटणारे पण म्हटलं तर जातश्रेष्ठत्वाने पछाडलेले आहेत. भांडवली व्यवस्थेच्या विरुध्द विचार मांडता मांडता तुम्ही स्वतःच त्या व्यवस्थेचा भाग कधी झालात हे तुम्हालाच कळले नाही, असा निशाणा अंधारे म्हणाल्यात.*

*दरम्यान, स्त्री आधार केंद्राचा गवगवा करत अनेक पदं, पुरस्कार अन् माया जमा करणाऱ्या तुम्ही खेळाडू महिलांबद्दल अवाक्षरही बोलला नाहीत. ना कृषी कायदा आंदोलनात चिरडलेल्या शेतकऱ्यांबद्दल ब्र शब्द काढला. ही केवढी मोठी शोकांतिका म्हणायची..! दुसरीकडे, तुम्हाला आठवतं का जाधवर ग्रूप ऑफ इन्स्टिट्युटच्या विद्यार्थी संसद कार्यक्रमात २०१८ साली मी आपल्याला भेटून शिवसेनेत येण्याची इच्छा व्यक्त केली. त्या कार्यक्रमात खडसे साहेबही होते. तेव्हा आपण तो विषय झुरळासारखा झटकून दिला होता. तेव्हाही आपला अहंकार आणि जातश्रेष्ठत्व वाद मला कळायला हवा होता. पण मग पुढे अनेक लोक भेटत राहीले. सागर माळकर, मदन गाडे, कितीतरी. अगदी मागील वर्षीही माझा प्रवेश तुम्हाला अजिबात आवडला नव्हता. अन् हे माझ्याही आधी सन्मानिय वरिष्ठांनी हेरले होते. म्हणूनच प्रवेशाच्या दिवशीच तुमचा उल्लेख त्यांनी 'खाष्ट सासू" असा केला, असं म्हणत अंधारे यांनी अनेक धक्कादायक गौप्यस्फोट केले आहेत. तुम्ही माझा द्वेष करताना त्याची कारणं जातीय अधिक होती. सर्वसामान्य कष्टकरी कुटुंबातील मुलगी स्वकर्तृत्वाने ऊभी राहणे तुम्हाला न मानवणारे होते. तुम्हाला राजकीय जन्म प्रकाश आंबेडकरांनी दिला पण समोर संधी दिसताच तुम्हाला त्याचा ही विसर पडला. कालचा तुम्ही केलेला उल्लेख ही तुमच्यातला काठोकाठ भरलेला जातीय विखार सांगणारा होता. तुम्ही भलेही कितीही पदे भोगली (हो भोगलीच, भूषवली नाही) असतील पण माणूस म्हणून तुम्ही कमालीच्या भणंग आणि कफल्लक आहात. कारण ना तुम्ही कुणाला मदतीचा हात देवू शकता ना कुणाचा उत्कर्ष बघू शकता ना उपकारकर्त्यांची जाणीव ठेवू शकता...*

*तुम्ही राहता त्या मॉडेल कॉलनी, शिवाजीनगरमध्ये ना साधी एक शाखा काढू शकलात ना, एखादा नगरसेवक निवडून आणू शकलात. महापालिकेत नगरसेवक म्हणून निवडून येण्याचा वकूब नसताना ज्या पक्षाने एवढं दिलं तो पक्ष आणि कुटुंब संकटात असताना, सत्तेसाठी पळ काढला. पण कुठलेही सत्तास्थान नसताना आमच्यासारखे निष्ठावान ठामपणे मातोश्रीसोबत निकराची झुंज देत आहेत. अन् तुमच्यासारखे खुर्च्या टिकवण्यासाठी छळ कपट करणाऱ्यांची भाटगिरी करत आहेत.*

---

# पुण्यात पोलिसांचा वचक बसण्यासाठी काढली गुंडांची धिंड!

## » जरब बसण्यासाठी उपायांवर भर; गुंडांची 'वरात' किती सुरक्षित?

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहरातील उच्चभ्रू आणि सुरक्षित समजल्या जाणाऱ्या सदाशिव पेठेत भरदिवसा तरुणीवर कोयत्याने झालेला जीवघेणा हल्ला, शहराच्या विविध भागांत वाहनांची तोडफोड, कोयत्याचा धाक दाखवून दुकानदारांना लुटण्याचे प्रकार, उपनगरांमध्ये कोयता गँगची वाढलेली दहशत आणि शहरातील महाविद्यालयांत कोयते फिरवणारे विद्यार्थी अशाप्रकारे शहरात फोफावलेल्या गुंडगिरीला चाप लावण्यासाठी पोलिसांनी त्यांची धिंड काढण्याची नामी शक्कल लढवली आहे. गुंडांवर वचक निर्माण व्हावा, यासाठी खुलेआम त्यांची 'वरात' काढण्यात येत असली तरी संबंधितांना रस्त्यावरून फिरवणे कितपत सुरक्षित आहे, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.**

शहरात 'कोयता गँग' नामक कोणतीही मोठी टोळी कार्यरत नसली, तरी शहराच्या विविध भागांत टोळक्यांनी कोयत्याचा वापर करून दहशत निर्माण केली आहे. वारंवार घडणाऱ्या या घटनांमुळे शहरातील कायदा आणि सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. या पार्श्वभूमीवर पोलिसही आता आक्रमक झाले असून गुंडांवर वचक बसावा, यासाठी विविध उपाय शोधण्यात येत आहेत.

### धिंड काढल्याने जरब बसेल?

गुंडांना जरब बसावी, यासाठी त्यांची रस्त्यावरून धिंड काढण्यात येत आहे.



तपासासाठी आरोपीला घटनास्थळी न्यावे लागते. त्या वेळी आरोपीला रस्त्यावर फिरवून लोकांचे मनोधैर्य वाढविण्याबरोबरच नागरिकांच्या मनात पोलिसांप्रति विश्वास निर्माण व्हावा, यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात येत आहेत. धिंड काढल्याने गुन्हेगारांवर खरोखरीच वचक बसणार का, असा प्रश्न असून, प्रसिद्धी मिळाल्याने आरोपींमध्ये गुन्हेगारी मानसिकता अधिक बळावण्याची शक्यता जास्त आहे.

### झुंडबळीचा टळला अनर्थ

सदाशिव पेठेत तरुणीवर हल्ला झाल्यानंतर तेथून जाणारे लोक घाबरून सैरावैरा पळत होते. काही तरुणांनी आरोपीला पकडल्यानंतर जमाव प्रक्षुब्ध झाला आणि आरोपीला मारण्यासाठी पुढे आला. तरुणांनी आरोपीला पकडून पोलिस चौकीत नेऊन बंदिस्त केल्याने जमावापासून त्याचे संरक्षण झाले. आरोपीवर कायदेशीर कारवाई व्हावी, यासाठी तरुणांनी प्रयत्न केल्याने झुंडबळीचा अनर्थ टळला.

# समाजसेवेचा वसा जपा!

## पालकमंत्री चंद्रकांत पाटील : वित्त क्षेत्रातील विद्यार्थ्यांची 'मेगा परिषद'

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लेखा आणि वित्त क्षेत्रातील विद्यार्थ्यांना त्यांचे उच्च शिक्षण पूर्ण केल्यानंतर निश्चितच एखाद्या नामांकित कंपनीत किंवा संस्थेत मोठ्या हुद्द्यावर काम मिळेल. तथापि त्यांनी या कामासोबतच आपला थोडा वेळ समाजसेवा करण्यासाठीही द्यावा, असे मत उच्च व तंत्रशिक्षण मंत्री तथा पुण्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केले.**




इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटंट्स ऑफ इंडिया, पिंपरी चिंचवड शाखेच्या वतीने ८ व ९ जुलै रोजी लेखा आणि वित्त क्षेत्रात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मेगा परिषदेचे आयोजन महापालिकेच्या निगडी प्राधिकरण येथील ग. दि. माडगुळकर नाट्यगृहात करण्यात आले आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना पालकमंत्री चंद्रकांत पाटील बोलत होते. या परिषदेला आमदार महेश लांडगे, माजी नगरसेवक शत्रुघ्न काटे, एकनाथ पवार, इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटंट्स ऑफ इंडियाचे अध्यक्ष अनिकेत तलाठी, उपाध्यक्ष रणजित आगरवाल, विद्यार्थी कौशल्य संवर्धन मंडळाचे अध्यक्ष मंगेश किनरे, उपाध्यक्ष श्रीधर मुप्पाला, परिषद संचालक पियुष छाजेड, वैभव मोदी, लेखा आणि वित्त क्षेत्रातील शहरातील विद्यार्थी, व्यावसायिक आदी मान्यवर उपस्थित होते. दुपारच्या तांत्रिक सत्रामध्ये सनदी लेखापाल अभय छाजेड यांनी लेखा आणि लेखापरिक्षण मानंकांबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यामध्ये आर्थिक फसवणूक कशी टाळावी आणि कर संपादन कायद्यातील तरतूदीबाबत सविस्तर माहिती त्यांनी दिली. या परिषदेचा पहिला दिवस आज उत्साहात पार पडला. उद्या देखील शिबीराचे आयोजन करण्यात आलेले असून त्यामध्ये सनदी लेखापाल उमेश शर्मा, जिगर दोशी,अर्पित काबरा, राजेश शुक्ला आणि अरविंद खिंवसरा मार्गदर्शन करणार आहेत. यासाठी शहरातील, लेखा व वित्त क्षेत्रातील विद्यार्थ्यांनी शिबिरात सहभाग घ्यावा असे आवाहन महापालिकेच्या तसेच संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

### विद्यार्थ्यांशी साधला संवाद...

**सनदी लेखापाल त्याप्रमाणे उद्योग तज्ञांशी संवाद साधून सविस्तर मार्गदर्शनाद्वारे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडावी यासाठी या दोन दिवसाच्या परिषदेचे आयोजन पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सहकार्याने करण्यात आले आहे. पहिल्या दिवशी विविध सनदी लेखापाल तसेच उद्योग तज्ञांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आणि त्यांच्याशी संवाद देखील साधला. त्यामध्ये सनदी लेखापाल सी. व्ही. चितळे यांनी कर आकारणीबद्दल तसेच डिजीटल मालमत्तेचे कर आकारणी आणि मिळणाऱ्या उत्पन्नाचे योग्य नियोजन याबद्दलही मार्गदर्शन केले. त्यानंतर सनदी लेखापाल जय छायरा यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणा देत उद्योग क्षेत्रात होणाऱ्या बदलांबद्दल आणि भविष्यातील उज्ज्वल संधींबद्दल मार्गदर्शन केले.**

# 'मास्टरमाईंड' भानू खळदेच्या मुसक्या पोलिसांनी आवळल्या!

## किशोर आवारे खून प्रकरण : गुंडा विरोधी पथकाची कामगिरी

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**किशोर आवारे यांच्या खून प्रकरणातील फरार आरोपी माजी नगरसेवक चंद्रभान उर्फ भानू विश्वनाथ खळदे याला गुन्हे शाखेच्या गुंडा विरोधी पथकाने नाशिकमध्ये बेड्या ठोकल्या. मागील ५६ दिवसांपासून खळदे पोलिसांना गुंगारा देत होता. जनविकास समितीचे संस्थापक किशोर आवारे यांची १२ मे रोजी तळेगाव दाभाडे नगरपरिषदेच्या इमारतीत हत्या करण्यात आली. दरम्यान, पोलिसांनी अवघ्या काही तासात मारेकरी शाम निगडकर, प्रविण धोत्रे, आदेश धोत्रे, संदीप मोरे, श्रीनिवास शिडगल यांच्यासह मनिष यादव या रेकॉर्डवरील सराईतांना अटक केली**



मात्र, याप्रकरणात आवारे यांच्या खुनाची सुपारी दिली म्हणून भानू खळदे याच्या मुलाचे नाव पुढे आल्याने पोलिसांनी गौरव चंद्रभान खळदे (वय २९) याला काही दिवसांनी अटक केली. मुलाला अटक झाल्याचे समजताच भानू खळदे फरार झाला होता. मागील ५ दिवसांपासून तो पोलिसांना गुंगारा देत होता.

### 'गुंडा स्कॉड' मदतीने खळदे जेरबंद...

**दरम्यान, आवारे खुनाचा तपास करण्यासाठी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी विशेष तपास पथकाची (एसआयटी) ची स्थापना केली. यासह गुंडा स्कॉड, गुन्हेशाखा युनिट पाच आणि अन्य गुन्हेशाखेची पथके आरोपींच्या मागावर होती. खळदे खंडाळा, दौंड, हैदराबाद आणि नाशिक जिल्ह्यातील सिंधी कॉलनीत वास्तव्याला असल्याची माहिती गुंडा स्कॉडचे प्रमुख, सहायक पोलीस निरीक्षक हरिष माने यांना समजली. त्यानुसार, पथकाने खळदे याला अटक केली.**

# "अजित पवार सोबत आल्याने महायुतीची ताकद वाढली"; खासदार श्रीरंग बारणे यांचा दावा..!

। पिंपरी । महाईन्यूज ।

राष्ट्रवादीचे नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे काही आमदारांसह भाजप आणि शिंदे सरकारमध्ये सामील झाले आहेत. यामुळे शिंदे आणि भाजपच्या आमदार, खासदारांमध्ये अस्वस्थता निर्माण झालेली आहे. असं असताना २०१९ मध्ये लोकसभेच्या निवडणुकीत अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांचा पराभव करणारे शिवसेनेचे (शिंदे गटाचे) विद्यमान खासदार श्रीरंग बारणे यांनी मात्र अजित पवार हे आमच्या सरकारमध्ये सामील झाल्याने महायुतीची ताकद वाढल्याचं म्हटलं आहे. तसेच २०२४ मध्ये होणाऱ्या मावळ लोकसभेच्या उमेदवारीवर पुन्हा एकदा दावा केला आहे. ते पिंपरी- चिंचवडमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

२०१९ मध्ये ऐनवेळी अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांना मावळ लोकसभेची उमेदवारी देण्यात आली. अजित पवार यांनी पार्थ पवार यांना



निवडून आणण्यासाठी मोठी ताकद लावली. तरी देखील सध्याचे विद्यमान खासदार श्रीरंग बारणे यांनी पार्थ पवार यांचा मोठ्या मताधिक्याने पराभव केला होता. याचे शल्य आजही अजित पवार यांच्या मनात असल्याचं बोललं जातं आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार आणि खासदार श्रीरंग बारणे हे एकमेकांचे कट्टर विरोधक मानले जातात. तेच अजित पवार काही आमदारांसह शिंदे-भाजप सरकारमध्ये सामील झाल्याने नेमकी बारणे यांची काय भूमिका असणार याकडे सर्वांचे लक्ष होतं. परंतु, त्यांनी अजित पवार यांच स्वागत करत महायुतीची ताकद वाढल्याचं वक्तव्य त्यांनी केला आहे.




# पुरुषसत्ताक समाजाचे व्यवच्छेदक लक्षण

**महाराष्ट्राला ऐतिहासिक काळापासूनच काका-पुतण्यांची जोडी काही लाभी दिसत नाही. अर्थात, पुतण्यांचा अधिकार मान्य करायचा नाही आणि त्यांना झगडायला लावायचे, हे कृषी संस्कृतीत हजारो वर्षे होत आले आहे. न वाढणारी सुपीक जमीन आणि त्याचवेळी वाढती कुटुंबे; हा त्यातला कळीचा संघर्ष असतो. याशिवाय, पुत्रांचे अंधप्रेम आणि त्यांच्यावर निकोप वंशवृद्धीची जबाबदारी हे पुरुषसत्ताक समाजाचे व्यवच्छेदक लक्षण आहे.**

यामुळेच, ते ओरिजिनल 'महाभारत' घडले. शरद पवार हे पुरोगामी असल्यामुळे त्यांनी पुरुषसत्ताकता सोडून कन्येला उत्तराधिकारी करण्याचा जो चंग बांधला; तो अखेर स्वतःला 'दबंग' म्हणवून न घेणाऱ्या अजित पवार यांनी ताकदीने उधळून दिला आहे. हे कौटुंबिक संघर्षाचे गळू फुटायला बराच काळ लागला. मात्र, ते आता फुटल्यानंतर त्यातून जे बाहेर पडते आहे; तो कधीही लिहिला न गेलेला इतिहास आहे. तो महाराष्ट्राचे कुटिल राजकारण समजण्यासाठी पुढे उपयोगी पडणार आहे. 'राष्ट्रवादी काँग्रेस'चे हे रौप्यमहोत्सवी वर्ष. त्या आधीपासून अजित पवार सक्रिय आहेत. याशिवाय, 'मी खोटे बोललो तर पवारांची अवलाद सांगणार नाही,' अशी उग्र प्रतिज्ञा ते करून बसले आहेत. ते बुधवारी अत्यंत आक्रमक मूडमध्ये होते आणि त्यांचा इतिहास खरा असेल तर तो शरद पवार यांचे वेगळेच दर्शन महाराष्ट्राला घडविणारा आहे. अजितदादांचे 'दिल खोल के' भाषण संपताच सुप्रिया सुळे यांनी तिकडे प्रतिमेळाव्यात भाषण सुरू केले आणि त्या 'प्रिय दादा'वर त्या तुटून पडल्या. या मेळाव्यातले शरद पवार यांचे भाषण मात्र त्यांच्या



धोरणी संयमाला साजेसे होते. तो संयम त्यांना टिकवावा लागेल.

महाराष्ट्राच्या राजकारणात 'पुरोगामी', 'प्रतिगामी', 'जातीयवादी' अशा संज्ञा वापरून चालणारी चर्चा-टीका किती पोकळ आणि बाष्कळ आहे; हे अजित पवार यांच्या वाक्यावाक्यातून दिसत होते. त्यांनी शरद पवार यांच्या राजकीय कारकीर्दीचा १९७८ पासूनचा जो पंचनामा केला; त्या तिखटपणाने शरद पवार यांच्या (दिवंगत गोपीनाथ मुंडे वगळता) कट्टर विरोधकांनीही कधी टीका केली नसेल. सुप्रिया सुळे यांनी तितक्याच आक्रमकपणे अजितदादांचा प्रतिपंचनामा केला आणि अमिताभ बच्चन, रतन टाटा, फारुख अब्दुल्ला अशा क्रियाशील वृद्धांचा दाखला दिला. 'तुम्हाला शतायुष्य लाभावे; पण तुम्ही कधी थांबणार आहात का नाही?' हा अजितदादांचा सवाल थेट होता. क्रियाशील असणे आणि इतरांच्या विकासाच्या वाटा अपत्यप्रेमापोटी अडकवणे, यातला फरक अजितदादांना सांगायचा होता. म्हणूनच 'पाचवेळा उपमुख्यमंत्रिपद पण पुढे हुलकावणी' ही खंत त्यांना आहे. प्रादेशिक पक्ष जेव्हा एका कुटुंबाच्या मालकीची जहागीर बनतात, तेव्हा याहून वेगळे काही होत नाही. अनेक राज्यांत हेच चालले आहे. खरे तर, घटनाकारांच्या स्वप्नातील संसदीय लोकशाहीची ही क्रूर चेष्टा आहे आणि 'आम्ही निवडून येतो ना?' असा प्रश्न जनतेच्या तोंडावर फेकून या पापातून कुणीही सुटू शकत नाही. त्यामुळे, याकडे कौटुंबिक सत्तासंघर्षाप्रमाणे संसदीय लोकशाहीला लागलेले घराणेशाहीचे ग्रहण म्हणूनही पाहायला हवे. अर्थात, आज ही चर्चा कुणालाही नको आहे. पण ती आवश्यक आहे. हे सगळे नेते, त्यांचे पक्ष आज आहेत, उद्या नसतील. पण भारताची संसदीय लोकशाही चिरायू आहे. तिची या घराणेशाहीच्या शापातून कधी तरी मुक्तता व्हायला हवी.

पवारांच्या घरातला हा कलह कृतक, शोभेचा नाही, हे बुधवारी अजित पवार आणि सुप्रिया सुळे यांच्या भाषणातून स्पष्ट झाले. राजकारणात काहीही घडू शकत असले तरी हा संघर्ष आता वाढत जाईल. तो अगदी बारामतीच्या घराघरापर्यंत पोहोचेल. जाहीरपणे अजित पवार काकांचा अध्यक्ष म्हणून उल्लेख करीत असले तरी त्यांनी कायदेशीर लढाईची किती भक्कम तयारी केली आहे; हे बुधवारी जारी झालेल्या प्रेस नोटवरून दिसते आहे. 'राष्ट्रवादी काँग्रेस' हा पक्ष कधीही पक्षाच्या घटनेनुसार चालला नसून मनमानी पद्धतीने चालविण्यात आला, असे त्यात स्पष्टच म्हटले आहे. जयंत पाटील यांची प्रदेशाध्यक्ष पदावरची निवडही 'हंगामी' होती, असेही तीत म्हटले आहे. तीस जूनला अजित पवार यांची या पक्षाच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे, असेही नमूद आहे. शिवसेना फुटीचा अनुभव बघून अजित पवार व सहकाऱ्यांनी बराच काळ कायदेशीर तयारी केल्याचे दिसते. पक्षाचे अध्यक्षच (म्हणजे शरद पवार) सदोष पद्धतीने या पदावर आल्याचेही त्यात म्हटले आहे. अजित गटाने सर्व स्तरांवरील किती मोठ्या लढाईची तयारी केली आहे, हेच यावरून दिसते. आज तरी अजित पवार यांच्या मागे जास्त आमदार असल्याचे दिसते. हे चित्र कायम राहणार का आणि महाराष्ट्रात दोन्ही गटांचे दौरे सुरू झाल्यानंतर कुणाला कसा प्रतिसाद मिळतो, यावर पुढचे राजकीय चित्र अवलंबून आहे. तूर्त तरी संघर्षाच्या पहिल्या आणि दुसऱ्या फेरीत पुतण्याने बाजी मारली आहे.

## संपादकीय »

### साधन की अडथळा?

***आठवडाभर एखाद्याच बातमीची चर्चा प्रसारमाध्यमांतून अधिक चालते, तेव्हा ती बातमी धक्कादायक वगैरे असतेच पण तिचे परिणामही दूरगामी असतात. हेच अमेरिकेत घडले.***

आपल्या 'आरक्षण धोरणा'शी थोडेफार साम्य असलेले आणि अमेरिकी कृष्णवर्णीयांना विद्यापीठांत प्रवेश अथवा सरकारी सेवांमध्ये प्राधान्य देणारे 'ॲफर्मेटिव्ह ॲक्शन' अर्थात सकारात्मक कृतीचे धोरण 'राज्यघटनेशी विसंगत, म्हणून अवैध' असल्याचा निकाल २९ जून रोजी अमेरिकी सुप्रीम कोर्टाने दिला. म्हणजे थोडक्यात, आरक्षण सरसकट रद्दच. अर्धशतकाहून अधिक काळ अमलात असणारे धोरण पालटून टाकणाऱ्या निर्णयावर जितकी उलटसुलट चर्चा कोणत्याही देशात घडेल, तितकी ती अमेरिकेतही घडते आहे. अर्थातच, हे धोरण असावे की नसावे हा त्या देशाचा अंतर्गत प्रश्न आहे. पण समतावादी समाजनिर्मितीसाठी सामाजिक उन्नतीचे ध्येय वैश्विक आहे आणि त्याला देशकालाची बंधने नसतात. जिथला समाज समतावादी नसतो तिथे लोकशाहीदेखील हरते, हेही त्रिकालाबाधित सत्य. त्यामुळे अमेरिकेत कोणत्या प्रकारे आणि कोणत्या आधारावर

**एकीकडे मंत्रिमंडळात अनेक निर्णय होत असताना उद्योग खात्याच्या मंत्रिमंडळ उपसमितीनेही ४० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणाऱ्या प्रकल्पांच्या उभारणीला मान्यता दिली आहे. महाराष्ट्रातील भाजप-शिवसेना आघाडीच्या सरकारने बुधवारी महत्त्वाच्या अनेक निर्णयांची माळ लावली असून ते तसेच्या तसे आणि वेगाने अमलात आले तर राज्यातील मोठ्या वर्गाला त्यांचा लाभ होईल.**

## निर्णय झाले; अमलात आणा

एकीकडे मंत्रिमंडळात अनेक निर्णय होत असताना उद्योग खात्याच्या मंत्रिमंडळ उपसमितीनेही ४० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणाऱ्या प्रकल्पांच्या उभारणीला मान्यता दिली आहे. हे प्रकल्पही कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा अशा विविध प्रदेशातील जिल्ह्यांमध्ये होणार आहेत. या मान्यता मिळालेल्या प्रकल्पांमध्ये छत्रपती संभाजीनगर येथे होणाऱ्या विजेवरील वाहनांच्या तसेच पुण्यात होणाऱ्या ई-बस निर्मिती कारखान्यांचे विशेष महत्त्व आहे. यापुढे, विजेवरील वाहनांची गरज वाढणार असून महाराष्ट्रातील हे कारखाने लवकरात लवकर सुरू होतील, हे सरकारने पाहायला हवे. याशिवाय, अहमदनगर, नंदुरबार, रायगड आदी ठिकाणी होणाऱ्या अशा सगळ्या प्रकल्पांमधून एक लाखापेक्षा अधिक रोजगार निर्माण होतील, असे म्हटले जाते.

महाराष्ट्रातील सुशिक्षित तसेच अर्धकुशल बेरोजगारीची समस्या आटोक्यात आलेली नाही. तिला ताकदीने भिडण्यासाठी



याहूनही मोठी, उत्पादक गुंतवणूक होण्याची गरज आहे. जेव्हा पुरेशा प्रमाणात रोजगार निर्माण होणे कठीण होते; तेव्हा सरकारला सर्वसाधारण लोककल्याणकारी निर्णयांवर भर देणे अधिकाधिक गरजेचे होते. मंत्रिमंडळाचे ताजे निर्णय बारकाईने पाहिले तर कल्याणकारी राज्य विविध सवलती, योजना आणि अंशदानाच्या रूपाने समाजापर्यंत पोहोचावे, यासाठी प्रयत्न झाल्याचे दिसेल. केंद्र आणि राज्य सरकारची आरोग्य योजना एकत्र करून राज्यातील सर्वच कुटुंबांना प्रत्येकी पाच लाख रुपयांचे उपचार देण्याचे पाऊल हा त्याचाच एक भाग आहे. केंद्र सरकारची आयुष्मान भारत आणि राज्य सरकारची महात्मा फुले जनआरोग्य योजना यांचे लाभ एकत्रित करण्याची कल्पना स्वागतार्ह आहे. यात राज्यातील १२ कोटी नागरिक आरोग्य विमा छत्राखाली येणार असतील तर ते मोठेच पाऊल ठरेल. मात्र, आता ही योजना सर्वव्यापी केल्यानंतर सरकारने वेगळ्या ओळखपत्राची अट काढून टाकावी. 'आधार कार्ड' हेच आता या योजनेसाठी पुरेसे असावे. अशी योजना राबविताना राज्यातील आरोग्य व्यवस्था किंवा यंत्रणा सक्षम आहे का, हा प्रश्नही सरकारने स्वतःला विचारायला हवा. मंत्रिमंडळाने नऊ नवी वैद्यकीय महाविद्यालये उघडण्याचेही ठरविले आहे. हा निर्णयही स्वागतार्ह आहे. राज्यात प्रत्येक जिल्हा रुग्णालयाला जोडलेले एक वैद्यकीय महाविद्यालय होऊ शकतेच. मात्र, आज राज्यातल्या सरकारी रुग्णालये व मेडिकल कॉलेजांतील रिक्त जागांचे प्रमाण व संख्या पाहिली की ही यंत्रणा किती दुबळी झाली आहे, याची कल्पना येते.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# खातेवाटप विस्तारानंतरच!

## राष्ट्रवादीचे मंत्री आठवडाभर खात्याविना; 2-3 दिवसांत आणखी काही जणांचा शपथविधी

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादीच्या नऊ मंत्र्यांच्या शपथविधीला आज, रविवारी एक आठवडा पूर्ण होत असला तरी या मंत्र्यांना अद्याप खातेवाटप झालेले नाही. खात्यांवरून चढाओढ सुरू असून, पुढील सोमवारी सुरू होणाऱ्या पावसाळी अधिवेशनापूर्वी पुन्हा मंत्रिमंडळ विस्तार करून मगच खातेवाटप करण्याच्या हालचाली सुरू आहेत.**



राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला १७ जुलैपासून सुरुवात होणार आहे. तत्पूर्वी, मंत्रिमंडळाचा विस्तार करण्याची योजना आहे. त्यात शिंदे गट आणि भाजपच्या आमदारांना संधी देऊन त्यांच्यातील नाराजी दूर करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याशी चर्चा करूनच विस्ताराबाबत निर्णय घेण्यात येणार आहे. येत्या दोन-तीन दिवसांत विस्तार होऊ शकतो, असे संकेत सरकारमधील उच्चपदस्थांकडून देण्यात आले आहेत.

मंत्रिमंडळ विस्तार आणि खातेवाटपाबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यात शुक्रवारी रात्री सविस्तर चर्चा झाली. काँग्रेस आणि राष्ट्रवादी आघाडी सरकारमध्ये राष्ट्रवादीच्या मंत्र्यांचा दबदबा असायचा. भाजपमध्ये मात्र तशी दादागिरी खपवून घेतली जाणार नाही, याकडे भाजपच्या एका वरिष्ठ नेत्याने लक्ष वेधले. त्यामुळे राष्ट्रवादीच्या मंत्र्यांना कोणती खाती मिळतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### नाराजी दूर करण्याचे प्रयत्न

राष्ट्रवादी काँग्रेसमधील अजित पवार गट सरकारमध्ये सहभागी झाल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत अस्वस्थता आहे. शिंदे यांनी बंडाच्या वेळी अनेकांना मंत्रिपदाचे आश्वासन दिले होते. मंत्रिपदावरून 'वर्षा' बंगल्यावर दोन आमदार भिडल्याचेही सांगण्यात येते. यामुळेच मुख्यमंत्री शिंदे यांना नागपूर दौरा अर्ध्यावर सोडावा लागला होता. 'राष्ट्रवादीच्या समावेशामुळे आमदारांमध्ये अस्वस्थता होती. पण, आमदारांशी चर्चा केल्यावर सर्वांचे समाधान झाले, असा दावा मुख्यमंत्री शिंदे यांनी केला. दुसरीकडे, नेतृत्वाकडून सातत्याने त्यागाचे आवाहन केले जात असल्याने भाजपच्या आमदारांमध्ये अस्वस्थता आहे. राष्ट्रवादीला सरकारमध्ये सहभागी करून घेण्याचा निर्णय हा वरिष्ठ नेतृत्वाचा असल्याचे स्पष्टीकरण उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत शुक्रवारी रात्री झालेल्या भाजप विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत आमदारांना देण्यात आले. भाजपने आमदारांची बैठक आयोजित करून आपल्या आमदारांना त्याग करण्याचा सल्ला पुन्हा एकदा दिला.

खातेवाटप रखडल्याने राष्ट्रवादीच्या मंत्र्यांमध्ये अस्वस्थता आहे. आठवडा होत आला तरी बिनखात्याचे मंत्री म्हणून राहावे लागत असल्याने मंत्र्यांना दौरे करता येत नाहीत. लोकांसमोर जावे कसे, असा प्रश्न या मंत्र्यांना पडला आहे. अजित पवार यांच्याकडे अर्थ खाते सोपविण्यास शिंदे गटाच्या आमदारांनी आक्षेप घेतला होता. यामुळेच राष्ट्रवादीच्या मेळाव्यात बोलताना निधीवाटपात आपल्याकडून कोणावरही अन्याय होणार नाही, याची ग्वाही अजित पवार यांना द्यावी लागली. छगन भुजबळ, दिलीप वळसे-पाटील, हसन मुश्रीफ हे सारेच १० ते १५ वर्षे मंत्रिपद भूषविलेले असल्याने त्यांना महत्त्वाची खाती द्यावी लागणार आहेत. उर्जा, जलसंपदा, गृहनिर्माण, अन्न व नागरी पुरवठा, महिला व बालकल्याण आदी भाजपच्या मंत्र्यांकडे असलेली खाती राष्ट्रवादीच्या मंत्र्यांकडे सोपवली जाण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्र्यांकडे असलेली अतिरिक्त खाती राष्ट्रवादीच्या मंत्र्यांना देऊ नयेत, अशी भूमिका शिंदे गटाच्या आमदारांनी घेतली आहे.

### कोणाचे किती मंत्री?

» मंत्रिमंडळात १४ जागा शिल्लक आहेत. भाजपला सहा किंवा सात आणि उर्वरित जागा शिंदे गट आणि राष्ट्रवादीत वाटून घेतल्या जातील, असे समजते. अजित पवारांसह छगन भुजबळ, दिलीप वळसे-पाटील, हसन मुश्रीफ आदी मंत्री १० ते २० वर्षे मंत्रिपद भूषविलेले असल्याने त्यांना महत्त्वाची खाती द्यावी लागणार आहेत. त्यामुळे येत्या काही दिवसांत होणाऱ्या मंत्रिमंडळ विस्तारात या तीन पक्षांना किती मंत्रीपदे मिळणार आणि खातेवाटप कसे होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# "तुमची असेल-नसेल ती सगळी ताकद लावा!

## मोदींना शरद पवारांचं जाहीर आव्हान; आम्ही भ्रष्टाचारी असू, तर हवी ती शिक्षा द्या

।नाशिक। वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पंतप्रधान नरेंद्र मोदी २७ जून रोजी भोपाळ येथे भाजपाच्या बूथ कार्यकर्त्यांना संबोधित करत असताना त्यांनी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसवर टीका केली होती, तसेच भ्रष्टाचाराचे आरोपही केले होते. पंतप्रधान मोदी म्हणाले होते की, शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीवर तब्बल ७०,००० कोटी रुपयांच्या घोटाळ्याचा आरोप आहे. भाजपा कार्यकर्त्यांनी थोडे प्रयत्न करायला हवेत आणि राष्ट्रवादीच्या घोटाळ्यांचा मीटर वाढवायला हवा, त्यांचे इतर घोटाळे बाहेर काढायला हवेत. पंतप्रधानांच्या या टीकेला शरद पवार यांनी येवल्यातून (नाशिक) उत्तर दिलं.**



शरद पवारांची आज येवल्यात जाहीर सभा पार पडली. यावेळी शरद पवार म्हणाले, १०-१२ दिवसांपूर्वी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक भाषण केलं. या भाषणात त्यांनी नेहमीप्रमाणे काँग्रेसवर हल्लाबोल केला. वेगवेगळे आरोप केले. हे करत असताना त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसवरही आरोप केले. त्यांनी त्यांच्या भाषणात एक-दोन उदाहरणं सांगितली. भ्रष्टाचाराचे आरोप केले. मी आज राष्ट्रवादी काँग्रेसचा अध्यक्ष म्हणून सांगतो, त्यांनी जे काही आरोप केले असतील, त्यात भ्रष्टाचाराचे आरोप असतील किंवा आणखी काही असेल, त्यावर त्यांनी कारवाई करावी.

शरद पवार म्हणाले, माझं देशाच्या पंतप्रधानांना जाहीरपणे सांगणं आहे की, संपूर्ण देशाची सत्ता त्यांच्या हातात आहे. ती त्यांनी लावावी आणि आमच्यापैकी कोणी जर भ्रष्टाचारात सहभागी आहे असं तुम्हाला वाटत असेल, तर तुमची असेल नसेल ती सगळी सत्ता वापरा, चौकशी करा, तपास करा आणि जो चुकीच्या रस्त्यावर गेलाय असं तुम्हाला वाटेल किंवा तुमचा तसा निष्कर्ष निघेल त्याला हवी ती शिक्षा द्या. त्यासाठी तुम्हाला आमचा पाठिंबा असेल.

भोपाळमधल्या सभेत बोलताना नरेंद्र मोदी म्हणाले होते, तुम्हाला गांधी परिवारातल्या मुला-मुलींचा विकास करायचा असेल तर तुम्ही काँग्रेसला मतदान करा. तुम्हाला शरद पवारांच्या मुलीचं भलं करायचं असेल तर तुम्ही राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला मतदान करा. मोदींच्या या टीकेला काही दिवसांपूर्वी शरद पवार यांनी उत्तर दिलं होतं.

शरद पवार पुढे म्हणाले की, एक काळ असा होता की, ज्यात चुका झाल्या असतील, तर त्या दुरुस्त केल्या पाहिजे म्हणून आम्ही झगडत होतो. मात्र आज परिस्थिती बदलली आहे. काही दिवसांपूर्वी मोदींनी भाषणात काँग्रेसवर टीका केली, राष्ट्रवादीवर भ्रष्टाचाराचा आरोप केला. माझं पंतप्रधान यांना सांगणे आहे की आम्ही भ्रष्टाचार केला असेल तर, असेल नसेल तर सर्व यंत्रणा वापरा, जर आम्ही दोषी असलो तर कारवाई करा, आमची जी काही चौकशी करायची ती करा, जो काही निष्कर्ष निघेल, तो आम्ही स्वीकारायला तयार आहे, अन्यथा माफी मागा, असे आव्हान शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना दिले आहे.

# टोमॅटोपेक्षा पेट्रोल स्वस्त!

## काही शहरांमध्ये टोमॅटोची किंमत 150 रुपये प्रति किलोच्या पुढे

### अबब! सोन्यासारखे चकाकले टॉमेटो!

। भोपाळ ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

सध्या टोमॅटो हा भाजप आणि काँग्रेस पक्ष यांच्यातील राजकीय वादाचा मुद्दा बनला आहे. भारतातील काही शहरांमध्ये टोमॅटोबरोबरच 'या' भाज्यांच्या किमती १५० रुपये प्रति किलोच्या पुढे गेल्याचे वृत्त आहे. नवी दिल्लीत बाजारात टोमॅटो १५० रुपये प्रतिकिलो विकले जात आहेत. टोमॅटोच्या किमती देशभरात वाढल्या असून भारतातील अनेक भागांमध्ये किरकोळ किंमत १०० रुपये प्रति किलोच्या पुढे गेली आहे. सूरतच्या बाजारात एक माणूस टोमॅटोची वर्गवारी करीत आहे.

भोपाळ, मध्य प्रदेशात टोमॅटो आणि इतर भाज्या, एलपीजी सिलिंडर आणि इतर जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किमतींविरोधात महिला काँग्रेस कार्यकर्त्यांनी आंदोलन केले.चेन्नई, तामिळनाडूमधील पन्नाई पसुमाई आउटलेटमधून वाजवी किमतीच्या दुकानात टोमॅटो पाठवले जात आहेत. बुधवारी काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी वाढत्या किमती आणि बेरोजगारीवरून मोदी सरकारवर टीकास्त्र सोडले.भाज्यांचे भाव खूप वाढले आहेत. टोमॅटो १५० रुपये किलोने विकला जात आहे. दरवाढीमुळे ग्राहकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. सरकारने हस्तक्षेप करून भाज्यांचे दर नियंत्रणात आणावेत, अशी विनंती करतो," असेही मल्लिकार्जुन खरगेंनी सांगितलं आहे. टोमॅटोचा भाव मुंबईत जानेवारी महिन्यात प्रति किलो २५ ते ३० रुपये होता. आता तो प्रति किलो १४० रुपयांवर पोहोचला आहे.



# ट्रम्प नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांच्यातली खुपणारी गोष्ट!

## नितीन गडकरी यांनी खुपते तिथे गुप्ते या कार्यक्रमातगडकरींनी स्पष्टच सांगितलं

। सेंट पॉल ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**अमेरिकीदेशाचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी खुपते तिथे गुप्ते या कार्यक्रमात उपस्थिती लावली. या कार्यक्रमात त्यांनी दिलखुलास गप्पा मारल्या आणि अवधूत गुप्तेंच्या प्रश्नांना तेवढीच दिलखुलास पणे उत्तरं दिली. यावेळी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यातली खुपणारी गोष्ट काय हे सांगितलं आहे. त्यांनी दिलेली ही उत्तरं चर्चेत आहेत.**

**काय म्हणाले आहेत गडकरी मोदी आणि अमित शाह यांच्याविषयी?**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविषयी खुपणारी गोष्ट म्हणजे, ते स्वतः खूप काम करतात, परिश्रम करतात आणि सगळ्यांना काम करायला लावतात. त्यात लोक थकून जातात असं गडकरींनी म्हटलं आहे.

**अमित शाह यांच्यातलं काय खुपतं?**

अमित शाह हे कायम गंभीर असतात. टेन्शनमध्ये असल्यासारखे वाटतात असं म्हणत त्यांच्यातली खुपणारी गोष्ट काय आहे ते नितीन गडकरी यांनी सांगितलं आहे. खुपते तिथे गुप्ते या कार्यक्रमात मॅजिक बॉक्स नावाचा एक सेगमेंट आहे त्यात एक एक फोटो समोर येतो आणि त्यातली खुपणारी गोष्ट सांगायची असते. या दोघांचे फोटो समोर आल्यावर नितीन गडकरी यांनी त्यांच्याविषयी ही दोन



उत्तरं दिली आहेत. तर दुसरीकडे शरद पवार यांचा फोटो आला तेव्हा शरद पवार हे स्पष्ट कधीच बोलत नाहीत ते आपल्याला खुपतं असं नितीन गडकरींनी म्हटलं आहे.

महाराष्ट्राची राजकीय परंपरा देशातल्या राजकारणापेक्षा वेगळी आहे. वैचारिक मतभेद असतील पण मनभेद नव्हते. मी पण १८ वर्षे विधीमंडळात होतो. कठोर टीका करायचो आम्ही पण व्यक्तिगत मैत्री होती. आता थोडं जास्त झाल्यासारखं वाटतं आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे सर्वसामान्य माणसाला कंटाळा आला आहे. त्याचा रस या राजकारणात नाही, तुम्ही काय काम करता त्यात आहे असं नितीन गडकरींनी म्हटलं आहे.

माझ्या एका मित्राने मला खूप चांगली गोष्ट सांगितली होती. तो मला म्हणाला होता राजकारण हा ईर्ष्या, मत्सर, द्वेष, अहंकार, अभिनिवेष यांचा खेळ आहे. पण एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे दोन रेषा आहेत, एक तुमची आहे आणि एक दुसऱ्याची आहे.

आता तुमच्याकडे दोन मार्ग आहे एक म्हणजे दुसऱ्याची रेषा पुसण्याचा प्रयत्न करणं किंवा आपली रेषा मोठी करणं. आपण नेहमी आपली रेषा मोठी करायला पाहिजे, दुसऱ्याची पुसायला जाऊ नये असाही सल्ला नितीन गडकरींनी दिला.

# 'बॉम्बे टू मुंबई' प्रवास मांडायचाय'

हिंदी-मराठी चित्रपटांचे दिग्दर्शन, अभिनय, बिग बॉससारख्या शोचे सूत्रसंचालन, वेब मालिकांची निर्मिती, नाटकाची निर्मिती अशा सगळ्याच माध्यमातून सातत्याने कार्यरत असलेलं मराठीतलं एक नाव म्हणजे महेश मांजरेकर. 'एका काळेचे मणी' या जिओ सिनेमावरील वेब मालिकेचे निर्माते म्हणून ते सध्या पुन्हा एकदा प्रेक्षकांसमोर आले आहेत. चित्रपटांचं कामही एकीकडे सुरूच आहे. आता मुंबई शहराची गोष्ट नव्या माध्यमातून सांगण्याचा आपला प्रयत्न असून त्यासाठी अभ्यास-संशोधन सुरू असल्याची माहिती महेश मांजरेकर यांनी दिली.

"तुमची असेल-नसेल ती सगळी ताकद लावा अन्…", पंतप्रधान मोदींना शरद पवारांचं जाहीर आव्हान

मुंबईचा इतिहास, मुंबई आधी काय होती आणि आता काय आहे? मुंबईचं राजकारण, चित्रपट, खेळ हे सगळं वेगळ्या पद्धतीने मांडण्यासाठी अभ्यास सुरू आहे. थोडक्यात 'बॉम्बे ते मुंबई' हा प्रवास मला मांडायचा आहे, असं सांगतानाच सतत काम करत राहिल्यानेच आपल्याला ऊर्जा मिळते. त्यामुळे यापुढेही प्रत्येक माध्यमातून काम करत राहणार असं ते ठामपणे सांगतात. 'एका काळेचे मणी' या वेब मालिकेची निर्मिती त्यांनी केली असली तरी याचं एकूणच श्रेय ऋषी मनोहर, ऋतुराज शिंदे आणि ओम भूतकर या तीन तरुणांचं आहे असं ते सांगतात. 'ओमने या वेब



मालिकेचं लिखाण केलं आहे. एका कुटुंबाच्या दैनंदिन आयुष्यात घडणाऱ्या विनोदी घटना.. असं स्वरूप आमच्या डोक्यात होतं. आम्हाला कुठलाही फार्स करायचा नव्हता. काळे नावाच्या कुटुंबात घडणारी गोष्ट म्हणून 'एका काळेचे मणी'. या वेब मालिकेच्या एकूणच संकल्पनेपासूनच्या प्रक्रियेत तरुणांचा सहभाग अधिक होता हे मला फार महत्त्वाचं वाटलं. संपूर्ण कुटुंब घरात बसून पाहू शकेल अशी वेब मालिका मला करायची होती आणि या तिघांनी ती कल्पना तंतोतंत अमलात आणली' अशा शब्दांत त्यांनी या तरुण तुर्कांचं कौतुक केलं.

# मणिपूरमध्ये फॅशन

मणिपूर मधील इम्फाल येथे एका फॅशन शो व्हेन्यू जवळ मोठा धमाका झाल्याचं समोर आलं आहे. या फॅशन शो मध्ये सनी लियोनी भाग घेणार होती. फॅशन शो संबंधित एका अधिकाऱ्यानं याविषयी माहिती दिली आहे.या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसल्याचं कळत आहे. हा धमाका मणिपूरच्या हट्टा कांगजीबंग परिसरात झाला आहे. व्हेन्यू या दूर्घटनाग्रस्त ठिकाणाहून जवळपास १०० मीटर अंतरावर होता. शनिवारी ४ फेब्रुवारी रोजी सकाळी ६.३० वाजता हा धमाका झाला आहे.वेगवेगळ्या धर्मातून आहेत कियाराचे आई-वडील,चला जाणून घेऊया अभिनेत्रीच्या पालकांचं मूळ घराणं..

अधिकाऱ्यानं सांगितलं आहे की, हा स्फोट एक्सप्लोसिव्ह डिव्हाइसमुळे की ग्रेनाइडमुळे झाला आहे हे अद्याप स्पष्ट झालेलं नाही. अद्याप कोणत्याही दहशतवादी संघटनेनं हा स्फोट घडवून आणण्याची जबाबदारी स्विकारलेली नाही. स्फोट जिथे झाला आहे तिथून काहीच अंतरावर फॅशन शोसाठी स्टेज बांधण्यात आला होता. घटनास्थळी पोहोचलेल्या पोलिसांनी तातडीनं तपासाची सूत्र हाती घेतली आहेत. पोलिसांच्या एका टीमनं तेथील आसपासच्या ठीकाणांचे सर्च ऑपरेशन सुरू केले आहे. अद्याप यासाठी कोणालाही ताब्यात घेण्यात आलेलं नाही.सनी लियोनी रविवारी म्हणजे उद्या ५ फेब्रुवारी रोजी या फॅशन शो मध्ये शो स्टॉपर म्हणून भाग घेणार होती. ती मणिपूरमध्ये जाऊन खादी आणि हॅंडलूम सारख्या प्रॉडक्ट्सना प्रमोट करणार होती. या शो ची टॅगलाइन होती.. सनी



# श्रद्धा कपूरने दिली प्रेमाची कबुली

बॉलिवूड अभिनेत्री श्रद्धा कपूर जवळजवळ २ वर्षांपासून चित्रपटापासून लांब आहे. २०२० मध्ये 'बाघी ३'मध्ये श्रद्धा मुख्य भूमिकेत दिसली होती. त्यानंतर आता २ वर्षांनी श्रद्धा कपूरचा 'तू झुठी मै मक्कार' हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटात श्रद्धाबरोबर रणबीर कपूर मुख्य भूमिकेत दिसणार आहे. प्रथमच श्रद्धा आणि रणबीर ही जोडी प्रेक्षकांना बघायला मिळणार आहे.

लव रंजन दिग्दर्शित या चित्रपटाचा ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला असून प्रेक्षकांच्या चांगलाच पसंतीस पडला आहे. तरुण पिढीचे प्रेमाबद्दलचे विचार आणि प्रेमाकडे बघायचा दृष्टिकोन यावर चित्रपटात प्रकाश टाकण्यात आला आहे. रोमॅंटिक कॉमेडी असलेल्या या चित्रपटाचं 'तेरे प्यार में' हे फ्रेश गाणंसुद्धा नुकतंच प्रदर्शित झालं आहे. अरिजित सिंगच्या आवाजातील हे गाणं लोकांना चांगलंच आवडलं आहे, शिवाय यात श्रद्धा आणि रणबीरमधील केमिस्ट्रीसुद्धा प्रेक्षकांना आवडली आहे.सध्या रणबीर आणि श्रद्धा दोघेही या चित्रपटाचं प्रमोशन करण्यात व्यस्त आहेत. या गाण्याचं प्रमोशन करतानाच श्रद्धाने तिच्या प्रेमाबद्दल खुलासा केला आहे. एक व्हिडिओ शेअर करत श्रद्धाने तिच्या प्रेमाची कबुली दिली आहे. इतकंच नाही तर या व्हिडिओ शेअर करत तिने तिच्या चाहत्यांनासुद्धा त्यांच्या प्रेमाची कबुली देत या नव्या गाण्यावर रील शेअर करायची विनंती केली आहे.

या व्हिडिओमध्ये श्रद्धा स्वतःसाठी पाणी पुरी बनवत आहे, आणि ती पाणी पुरी खाताना श्रद्धा खूप आनंदी आहे. या व्हिडिओच्या माध्यमातून श्रद्धा पाणीपुरीच्या प्रेमात आकंठ बुडाली असल्याचं स्पष्ट झालं आहे.



# कार्तिक आर्यन सारा अली खानबरोबर पुन्हा करणार 'आशिकी'

'आशिकी' या १९९० साली प्रदर्शित झालेल्या चित्रपटातील प्रेमकथा प्रेक्षकांना फारच भावली होती. २०१३ साली या चित्रपटाचा सिक्वेल म्हणजेच 'आशिकी २' प्रदर्शित करण्यात आला. आता याच चित्रपटाच्या तिसरा भाग लवकरच प्रदर्शित होणार आहे. आशिकी ३' चित्रपटात बॉलिवूड अभिनेता कार्तिक आर्यन प्रमुख भूमिका साकारताना दिसणार आहे. कार्तिकबरोबर यामध्ये आता त्याच्या एक्स गर्लफ्रेंडबरोबर दिसणार आहे.

कार्तिकसह 'आशिकी ३' चित्रपटात नायिकेची भूमिका कोण साकारणार याबाबत



गेल्या अनेक दिवसांपासून चर्चा सुरू होती. बॉलिवूडमधील आघाडीच्या अभिनेत्रींची नावेही पुढे आली होती. दीपिका पदुकोण, क्रिती सेनॉन किंवा श्रद्धा कपूर मुख्य भूमिकेत दिसणार असल्याची चर्चा होती यात दाक्षिणात्य अभिनेत्री रश्मिका मंदना दिसणार होती मात्र आता सारा अली खान झळकणार अशी चर्चा आहे.कार्तिक सारा याआधी लव्ह आजकल २ चित्रपटात एकत्र दिसले होते. हा चित्रपट फारसा चालला नाही. या चित्रपटानंतर दोघांच्या अफेअरच्या चर्चा रंगल्या होत्या. आशिकी ३ निर्मात्यांना हा चित्रपट रोमॅंटिक बनवायचा आहे म्हणून निर्मात्यांना अशीच एक जोडी अपेक्षित आहे. या चित्रपटात अभिनेते पंकज त्रिपाठी दिसणार अशी ही चर्चा सुरु आहे. टी- सीरिजचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि निर्माते भूषण कुमार यांनी 'आशिकी ३'ची घोषणा केली आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन अनुराग बासू करणार आहेत. अभिनेता कार्तिक आर्यन सध्या चर्चेत आहे. मागच्या वर्षी त्याचा 'भूलभुलैय्या २' हा चित्रपट खूप चालला.

# भारतात वर्ल्ड कप खेळण्यासाठी पाकिस्तानचे मोठे पाऊल!

## परराष्ट्र मंत्री बिलावल भुट्टो झरदारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती

**इस्लामाबाद । नवी दिल्ली। वृत्तसंस्था**

**भारतामध्ये वर्ल्ड कप खेळण्यापूर्वी आता पाकिसताननने सुरक्षा सामितीची स्थापना केली आहे. या सुरक्षा समितीमध्ये नेमकं कोणलाा स्थान देण्यात आले आहे हे समोर आले आहे. परराष्ट्र मंत्री बिलावल भुट्टो झरदारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती भारतात होणाऱ्या वर्ल्ड कप क्रिकेट स्पर्धेतील पाकिस्तानच्या सहभागाबाबतचा अहवाल देणार आहे..**

ही समिती लवकरच भारत दौऱ्यावर येणार असून, पाकिस्तानचे सामने होणार असलेल्या ठिकाणांच्या सुरक्षेबाबत आढावा घेणार आहे. पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी नियुक्त केलेल्या या समितीत बिलावल यांच्यासह तीन मंत्र्यांचा समावेश आहे. त्याचबरोबर पाकमधील आगामी निवडणूक लक्षात घेऊन सर्व प्रमुख पक्षांच्या प्रतिनिधींना स्थान देण्यात आले आहे.

भारतात ५ ऑक्टोबरपासून होणाऱ्या वर्ल्ड कप वन डे क्रिकेट स्पर्धेचा कार्यक्रम जाहीर झाला आहे; मात्र अजूनही त्यातील पाकिस्तानचा सहभाग निश्चित नाही. पाक संघाच्या स्पर्धेतील सहभागास अद्याप पाकिस्तान सरकारने मान्यता दिलेली नाही. पाकिस्तान सरकारचे पथक भारतातील सुरक्षेबाबत आढावा घेणार आहे. त्यानंतरच पाकिस्तान सरकार अंतिम निर्णय घेईल. भारतातील वर्ल्ड कप स्पर्धेतील सहभागाबाबत पाक बोर्डाने तेथील सरकारची परवानगी मागितली आहे. त्याच पत्रात सरकार सुरक्षा पथक पाठवणार का? अशीही विचारणा करण्यात आली होती.



पाकिस्तान आणि भारत यांच्यात १५ ऑक्टोबरला वर्ल्ड कपमधील साखळी लढत अहमदाबादला होणार आहे. या सामन्याबाबत सुरक्षा समितीचा अहवाल महत्त्वाचा असेल. त्याचबरोबर पाकिस्तानचा संघ हैदराबाद, बेंगळुरू, कोलकाता आणि अफगाणिस्तान येथे खेळणार आहे. अहमदाबाद वगळता अन्य ठिकाणी पाकिस्तान दोन सामने खेळणार आहे. परराष्ट्र मंत्री झरदारी प्रमुख असलेल्या समितीत अंतर्गत सुरक्षा मंत्री राणा सानानुल्ला, कायदा आणि न्याय मंत्री आझम नझीर तरार हे मंत्रीही आहेत. त्याचबरोबर आंतर प्रदेशीय समन्वय मंत्री एहसान उर रेहमान माझारी, माहिती मंत्री मरियम औरंगजेब, असद मेहमूद, अनिमुल हक, कमार झमन कायरा आणि पंतप्रधानांचे परराष्ट्र विषयक सल्लागार तारिक फातेमी यांचाही समावेश आहे.

या समितीत गुप्तचर यंत्रणेतील सदस्यांसह परराष्ट्र खात्यातील सचिवही आहेत. त्याचबरोबर विविध पक्षांच्या नेत्यांचाही समावेश आहे. पाकिस्तानच्या सध्याच्या सरकारचा कालावधी ३४ दिवसांचा आहे. त्यानंतर निवडणुका घोषित होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सत्तेत बदल झाल्यास भविष्यात कोणतेही प्रश्न निर्माण होऊ नयेत यासाठीच सर्वपक्षीय सदस्यांचा समावेश केला असल्याचे मानले जात आहे.

एखाद्या क्रीडा स्पर्धेतील राष्ट्रीय संघाच्या सहभागाबाबतचा निर्णय घेण्यासाठी पाकिस्तानने प्रथमच एवढी उच्चस्तरीय समिती नेमली आहे. यापूर्वी पाकिस्तान संघाच्या भारतातील स्पर्धेतील सहभागाबाबतचे निर्णय परराष्ट्र मंत्रालयच घेत असे; मात्र या वेळी केवळ भारतातच होणाऱ्या वर्ल्ड कप स्पर्धेबाबत निर्णय होणार आहे. सर्वंकष परिस्थिती लक्षात घेऊनच या स्पर्धेतील सहभागाबाबत कोणताही चुकीचा निर्णय घेतला जाऊ नये, यासाठी पाकिस्तानचे सरकार विशेषतः पंतप्रधान शरीफ

---

# ना सचिन, ना धोनी, ना विराट...

# राजघराण्यातील हा खेळाडू आहे भारतातील सर्वात श्रीमंत क्रिकेटपटू!

## 20 हजार कोटी नेटवर्थ, समरजितसिंह रणजितसिंह गायकवाड श्रीमंत क्रिकेटपटू

**। नवी दिल्ली ।**

**महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

**अजित विराट कोहलीने अलीकडेच १ हजार कोटी रुपयांच्या संपत्तीचा आकडा ओलांडला, तर माजी भारतीय कर्णधार एमएस धोनी आणि सचिन तेंडुलकर त्याच्या वर आहेत. सचिनची एकूण संपत्ती १४ कोटी रुपये आहे. मात्र, असे असूनही तो भारतातील सर्वात श्रीमंत क्रिकेटपटू नाही. आम्ही ज्या क्रिकेटपटूचा उल्लेख करत आहोत ते आहेत समरजितसिंह रणजितसिंह गायकवाड आहेत.**



जगातील सर्वात श्रीमंत क्रिकेटपटू कोण हे तुम्ही कोणत्याही क्रिकेट चाहत्याला विचाराल तर तो सचिन तेंडुलकर, विराट कोहली किंवा एमएस धोनीचे नाव घेईल. पण खरंच हे क्रिकेटपटू भारतातील श्रीमंत क्रिकेटपटू आहे का? नाही, असे अजिबात नाही. भारतातच अशाच एका क्रिकेटपटूची संपत्ती २०,००० कोटी रुपये आहे. या क्रिकेटपटूंचे नाव तुम्ही क्वचित ऐकले असेल. पाहूया कोण आहे हा सर्वात श्रीमंत क्रिकेटपटू. बडोद्यातील एका माजी प्रथम श्रेणी क्रिकेटपटूची संपत्ती २०,००० कोटी रुपयांची संपत्ती आहे. तो केवळ भारतातीलच नव्हे तर जगातील सर्वात श्रीमंत क्रिकेटपटू आहे.

### राजघराण्याशी संबंध

आम्ही ज्या क्रिकेटपटूचा उल्लेख करत आहोत ते आहेत समरजितसिंह रणजितसिंह गायकवाड आहेत. ते बडोद्याच्या राजघराण्यातील असून ते बडोद्यातील माजी प्रथम श्रेणी क्रिकेटपटू आणि बडोदा क्रिकेट असोसिएशनचे क्रिकेट प्रशासक आहेत. रणजी करंडक क्रिकेटमधील १९८७-८८ आणि १९८८-८९ हंगामातील सहा प्रथम श्रेणी सामन्यांमध्ये समरजितसिंगने ६५ च्या सर्वोच्च धावसंख्येसह ११९ धावा केल्या.

### जन्म आणि शिक्षण

२५ एप्रिल १९६७ रोजी जन्मलेले समरजितसिंह रणजितसिंह हे प्रतापसिंह गायकवाड आणि शुभांगिनीराजे यांचे एकुलते एक पुत्र आहेत. त्यांनी डेहराडूनमधील द दून स्कूलमध्ये शिक्षण घेतले, जिथे त्यांनी एकाच वेळी शाळेच्या क्रिकेट, फुटबॉल आणि टेनिस संघांचे नेतृत्व केले.

### 2012 मध्ये शाही जबाबदारी सांभाळली

मे २०१२ मध्ये वडिलांच्या मृत्यूनंतर, लक्ष्मी विलास पॅलेसमध्ये पारंपारिक समारंभात २२ जून २०१२ रोजी समरजीत सिंह यांना महाराजा म्हणून राज्याभिषेक करण्यात आला. लक्ष्मी विलास पॅलेस समरजीत सिंग यांच्या मालकीचा आहे. चांदी आणि शाही दागिने यासह राजवाड्याजवळील ६०० एकरहून अधिक स्थावर मालमत्ता त्यांच्याकडे आहे.

### समरजीतसिंह यांचा विवाह

एवढेच नाही तर गुजरात आणि बनारसमधील १७ मंदिरांचे ट्रस्टही ते सांभाळतात. २००२ मध्ये, समरजितसिंह यांचा विवाह वांकानेर राज्याच्या राजघराण्यातील राधिकाराजे यांच्याशी झाला. या जोडप्याला दोन मुली आहेत. हे चौघेही शुभांगिनीराजे यांच्यासोबत भारतातील सर्वात मोठे खाजगी निवासस्थान असलेल्या लक्ष्मी विलास पॅलेसमध्ये राहतात.